# गहू संशोधन विभाग
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

जा.क्र.व.सं.शा./गहू / 608 /२०२६ दि. 25/05 /२०२६

## निविदा सूचना

**विषय:-** सन २०२६-२७ मध्ये गहू संशोधन विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील प्रक्षेत्रावर कंत्राटपद्धतीने शेतीनिगडीत तसेच कार्यालयीन कामे करण्याकरिता बह्यास्त्रोताकडून दर बोलविण्यासाठी निविदा बोलविण्याबाबत.....

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, सन २०२६-२७ मध्ये गहू संशोधन विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथील प्रक्षेत्रावर शेतीनिगडीत तसेच कार्यालयीन कामे करण्याकरिता शासन नोंदणीकृत मनुष्यबळ पुरवठादार संस्थांकडून कंत्राटपद्धतीने बह्यास्त्रोताकडून मनुष्यबळ पुरविण्यासाठी सीलबंद लिफाफ्यात दरपत्रके खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

### सूचना, अटी व शर्ती

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दि. ०४.०६.२०२६. मुदतीनंतर येणारे निविदा पत्रके स्वीकारल्या जाणार नाहीत.
३. विहित मुदतीत प्राप्त निविदा दि. ०५.०६.२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. गहू संशोधन विभाग चे कार्यालयात उघडण्यात येतील.
४. निविदा मसुदा मध्ये नमूद नुसारच दर नमूद करावे. अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल.
५. निविदाधारक/कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.
६. निविदाधारक देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.
७. निविदेतील दर एक वर्षा करिता वैध राहतील.
८. दरपत्रक सीलबंद लिफाफ्यात वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, गहू संशोधन विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला चे नावाने पाठवावीत. निविदेचा संदर्भ नमूद करावा तसेच निविदा लिफाफाव्यावर **"कंत्राटपद्धतीने मनुष्यबळ पुरविणे"** असा उल्लेख करावा.
९. कोणतेही दरपत्रक स्वीकारण्याचे अथवा फेटाळण्याचे तसेच निविदा प्रक्रिया कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरी धारकाकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.
१०. कंत्राटदाराकडे संबधित कामाचा वैध परवाना असणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व इतर संबंधित आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
११. दरपत्रकासोबत पुढील नमूद प्रमाणे स्वक्षांकित सत्यप्रती सादर कराव्यात. मनुष्यबळ पुरविण्याचा परवान्याची सत्यप्रत, व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र, भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, सन २०२३-२४, २०२४-२५ व २०२५-२६ वर्षी भरलेले आयकर विवरण, ESIC, GST नोंदणी प्रमाणपत्र आदीच्या स्वक्षांकित सत्यप्रती सादर कराव्यात.

१२. संबधीत कामे कंत्राट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील. करा संबंधी कोणतीही तक्रार असल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१३. प्रक्षेत्रावरील संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांना Labour act कायद्यानुसार क्याशलेस पद्धतींचा अवलंब करणे तसेच सर्व प्रकारचे करांचा भविष्य निर्वाह निधी, विमा संरक्षण नियमित भरणा करणे, किमान वेतन नियमाप्रमाणे इत्यादींचा संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१४. सदर कामे कार्यालयीन दैनदिन स्वरुपाची असतील व शासकीय नियमाप्रमाणे प्रतीदिन आठ तासाचे काम असेल.

१५. कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ५८ वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

१६. एखादया कंत्राटी मजुरास कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तीची व्यवस्था किवा कामावर हजेर लावण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची असेल.

१७. सदर कामे हि पुर्णता बाह्यस्त्रोतामार्फत कंत्राटी पद्धतीने करावयाची असल्याकारणाने मजुराच्या जेष्टता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही .

१८. कोणत्याही कंत्राटी कामगारास कामावर ठेवणे व काढून टाकणे याबाबत संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीत अधिकाऱ्याकडे असतील.

१९. कंत्राटदराने दरपत्रकात कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायद्यातील इतर तरतुदीपेक्षा कमी रक्कम नमूद करु नये थोडक्यात कृषी विद्यापीठ यांच्यासाठी निर्धारित केलेले दर नमूद करावेत. कंत्राटदाराच्या मिशनवरच दरपत्रक निश्चित करण्यात येईल. किमान वेतन कायद्यानुसार वेतन धने बंधनकारक राहील.

२०. सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदारास बाल मजूर कायद्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

२१. वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार ESIC, PF, PT ई. देय रक्कम देणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील. याबाबत काही तंटा/तक्रार झाल्य्स कार्यालय हस्तक्षेप करणार नाही अथवा या कार्यालयाची किंवा विद्यापीठाची जबाबदार राहणार नाही.

२२. कार्यालयाकडून विलंबाने देयक जमा झाले तरी प्रत्येक वेतन पुढील सात तारखेपर्यंत संबंधीत मजुरांना अदा करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. किमान वेतन कायद्यानुसार कामगारांना योग्य त्या शासकीय खात्यात ESIC, PF, PT ची रक्कम अदा केल्याची माहिती व सदरची नोंद व चलान प्रत्येक महिन्यात देयकासोबत सादर करणे बंदनकारक राहील.

२३. कंत्राटदारांचे दर कमी आहे म्हणून त्यांनाच काम पुरविण्यात येईल असे होणार नाही .जे कंत्राटदार किमान कायद्याअंतर्गत वेतन व नियमानुसार दर देतील त्यांचेच दर स्वीकारली जातील.

२४. कामगार आयुक्त नोंदणी प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

२५. उपरोक्त सर्व अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करणारे कंत्राटदार प्रक्रीयेमध्ये भाग घेण्यास पात्र असतील.

२६. या प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास अधिकार क्षेत्र अकोला जिल्हा न्यायालय राहील.

२७. सर्व प्रक्षेत्रावरील कामे एकाच वेळेस आल्यास प्रक्षेत्रावरील कामे वेळेत होण्याच्या दृष्टीने -L१ नुसार कामे एका पेक्षा जास्त कंत्राटदारास वाटून देण्याचे अधिकार काम करून घेणाऱ्या संबंधित विद्यापीठातील अधिकारी यांना राहतील .

२८. कंत्राटी मजुरास काम करतेवेळी इजा,विज .अपघात अथवा मूत्यू स्भाविल्यास किवा नैसर्गिक आपत्ती उदा, पाऊस भूकंपप्राणी आणि वाढळामुळे इजा अपघात अथवा मूत्यू संभविल्यास त्याची सर्व भरपाई आणि इतर ,मशिनरी , कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील याचा या कार्यालयाशी अथवा विद्यापीठाशी किठलाही प्रकारचा संबंध राहणार नाही.

२९. प्रक्षेत्रावरील तसेच तांत्रिक कामे करीत असतांना पिकाचे/यंत्राचेनुकसान झाल्यास .सुट्टया भागाचे ई/नवीन/वहानाचे/ विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रम ाणे नुकसान भरपाई संबधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

३०. शासकीय नियमानुसार देय होणारे शासकीय कर संबंधित दरपत्रकात नमूद केलेल्या दरात काम करावयाची समर्थता दर्शविल्यास त्यांना काम देण्याचे हक्क कार्यालयाच्या समितीला राहतील तसेच दृतीय क्रमांकाच्या दरपत्रक धारकाने असमर्थत दर्शविल्यास तृतीय क्रमांकाच्या लघुत्तम दरपत्रक धारकाने प्रथम क्रमांकाच्या दरपत्रक धारकाच्या दरात काम करण्याची समर्थता दर्शविल्यास यांना काम देण्याचे हक्क निविदा समितीस राहतील.

३१. प्रक्षेत्रावरील विभागावर कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी, यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय नियंत्रण अधिकारी, मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचा राहील.

३२. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु ५०० चे स्टंप पेपर वर करारनामा सादर करणे संबधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

Senior Research Scientist
Wheat Research Unit,
Dr. P.D.K.V., Akola.

# निविदा (कोटेशन) मसुदा

| अ. क्र. | विवरण | अकुशल मजूर | | कुशल मजूर | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन प्रति मजूर वेतन रु. | प्रति महिना प्रति मजूर वेतन रु. | प्रति दिन प्रति मजूर वेतन रु. | प्रति महिना प्रति मजूर वेतन रु. | |
| १. | संस्थात्मक शेती करिता किमान वेतन | १८०/- | ४६८०/- | २४०/- | ६२४०/- | |
| २. | सुधारित विशेष भत्ता | १६५/- | ४२८५/- | १६५/- | ४२८५/- | |
| एकूण किमान वेतन (किमान वेतन नियमाप्रमाणे) | | ३४५/- | ८९६५/- | ४०५/- | १०५२५/- | |
| ३. | राज्य कामगार विमा (रा.का.वि.म. नियमाप्रमाणे) कामगाराचे योगदान (३.२५%) | | | | | |
| ४. | कामगार भविष्य निर्वाह निधी (का.भ.नि.नि. नियमाप्रमाणे) कामगाराचे योगदान (१३%) | | | | | |
| ५. | एकूण (१ ते ४) | | | | | |
| **६.** | **कमिशन रु.** | | | | | |
| | एकूण दर रु. (१ते ६) | | | | | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:** **स्वाक्षरी**

**दिनांक:** नाव व संपूर्ण

**टीप**

१. उपरोक्त नमूद दर हे किमान वेतन कायद्यानुसार तसेच वरिष्ठ कार्यालयांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार असून यापेक्षा कमी दर ग्राह्य धरण्यात येणार नाही.

२. प्रति महिना २६ दिवसांसाठी